**वाचले :-**

१)महाराष्ट्र शासनाकडील शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८, दि.२ डिसेंबर १९९७
२)महाराष्ट्र शासनाकडील शासन निर्णय क्र. अंनियो-२०१९/प्र.क्र.४७०/सेवा-४, दि.९ मे २०२२
३)आदेश क्र. साप्रवि/४/कावि/९२३/२०२४, दि.१०/०६/२०२४
४)आदेश क्र. साप्रवि/४/कावि/३२४/२०२४, दि.२३/०१/२०२४
५)मा.क्षेत्रिय अधिकारी, फ क्षेत्रिय कार्यालय यांचेकडील पत्र क्र. फक्षेका/प्रशा/१/कावि/१००/२०२५ दि.२४/०१/२०२५
६)मा.उपआयुक्त,अग्निशमन विभाग यांचेकडील पत्र क्र. अग्नि/१/कावि/६७६/२०२५ दि.०६/०२/२०२५
७)श्री.क्षीरसागर प्रकाश चंद्रकांत, लिपिक यांचा दि.२५/०९/२०२४ रोजीचा विनंती अर्ज
८)श्री.भोसले अनिल दादासाहेब, लिपिक यांचा दि.०४/०२/२०२५ रोजीचा विनंती अर्ज
९)मा.आयुक्त यांचेकडील दिनांक ११/०३/२०२५ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८,सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/३अ/कावि/३४/२०२५
दिनांक १२/०३/२०२५

**विषय :- लिपिक पदाचा राजीनामा मंजूर करणेबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर जाहिरात क्र. १८४/२०२२ अन्वये लिपिक या अभिनामाची रिक्त पदे सरळसेवेने भरणेत आली होती. कर्मचारी निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार लिपिक पदावर पे लेवल एस-६ वेतनश्रेणी र.रु. १९९००-६३२०० या वेतनश्रेणीमध्ये प्रथमतः ०२ वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरीता (Probation Period) तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देणेकामी उपरोक्त वाचले क्र. ३ व ४ अन्वये आदेश निर्गत करणेत आला आहे. लिपिक पदावरील काही कर्मचा-यांनी विविध पदांवर निवड झाल्याने महानगरपालिका सेवेचा राजीनामा मंजूर करणेकामी विनंती केली आहे. या कर्मचा-यांचा मनपा सेवेतील रुजू दिनांक, राजीनामा देण्याचे कारण, मनपा कोषागारात भरलेली रक्कम व पावती क्र. यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | कर्मचा-यांचे नाव, पदनाम | मनपा सेवेचा राजीनामा अर्ज दिनांक | मनपा सेवेचा राजीनामा मंजूर करावयाचा दिनांक | मनपा कोषागारात भरलेली रक्कम व पावती क्र. | मनपा सेवेचा राजीनामा देण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.क्षीरसागर प्रकाश चंद्रकांत | २५/०९/२०२४ | २६/०९/२०२४ | C/१३२८<br>दि.३०/०८/२०२४<br>अन्वये र.रु.३९,३१५/- | जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा येथे तलाठी पदी निवड |
| २ | श्री.भोसले अनिल दादासाहेब | ०४/०२/२०२५ | ०५/०२/२०२५ | C/३५७०<br>दि. ०४/०२/२०२५<br>अन्वये र.रु.३८,३००/- | महाराष्ट्र शासन,जलसंपदा विभाग येथे कालवा निरीक्षक पदी निवड |

उपरोक्त वाचले क्र.७ ते ८ अन्वये कर्मचा-यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेचा राजीनामा मंजूर करणेकामी विनंती केली आहे. उपरोक्त स्तंभ क्र.२ मधील कर्मचा-यांनी मनपा सेवेचा राजीनामा देणेकामी नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार मनपा कोषागारात स्तंभ क्र.५ नुसार मुळ वेतन भरले आहे.लिपिक पदावरील कर्मचा-यांकडून उपरोक्त वाचले क्र. ५ ते ६ अन्वये महानगरपालिकेस घरबांधणी कर्ज, घरदुरुस्ती कर्ज, संगणक कर्ज, वाहन कर्ज व कामगार कल्याण निधी कर्ज येणे बाकी नसून सद्यस्थितीत त्यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसून त्यांचा राजीनामा मंजूरीबाबत संबधित विभागप्रमुखांनी स्पष्टपणे शिफारस केली आहे.

सबब, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील वाचले क्र.१ व २ मधील शासन निर्णयातील तरतुदी, विभागप्रमुखांनी केलेली शिफारस व उपरोक्त कर्मचा-यांनी केलेला विनंती अर्ज विचारात घेता मी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रस्तुतच्या आदेशान्वये उपरोक्त स्तंभ क्र.२ मधील कर्मचा-यांचा मनपा सेवेचा राजीनामा स्तंभ क्र.४ मध्ये नमूद दिनांकापासून मंजूर करण्यास मान्यता देत आहे. तसेच या कर्मचा-यांचा स्तंभ क्र. ०४ मध्ये नमूद दिनांकापासून ते आदेशाचे तारखेपर्यंतचा कालावधी विनावेतनी करण्यात यावा. लेखापरिक्षणार्थ अन्य काही येणे रक्कम निघाल्यास ती आदेशातील लिपिक या पदावरील संबंधित कर्मचा-यांनी भरणे बंधनकारक राहील.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधित कर्मचारी यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

सही/-
**(शेखर सिंह)**
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रति –
श्री.क्षीरसागर प्रकाश चंद्रकांत (लिपिक), श्री.भोसले अनिल दादासाहेब (लिपिक),
प्रत –
१. लेखा विभाग २. लेखापरीक्षण विभाग ३. दूरसंचार विभाग ४. माहिती व जनसंपर्क विभाग ५. कामगार कल्याण विभाग ६. माहिती तंत्रज्ञान विभाग ७.साप्रवि टेबल क्र. ७,१०,१२,२२, ८.संगणक कक्ष साप्रवि ९. फ क्षेत्रिय कार्यालय १०. अग्निशमन विभाग.

उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८